ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-6 No. 16 June 2020

# 'रामायणातील सत्ता विभाजन पंचायतराज्य पद्धतीचे मुलस्त्रोत'

**प्राचार्य डॉ. दीपक कोटूरवार**
शिवशक्ती कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय बाभूळगाव, जि. यवतमाळ

**सारांश**

शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंत्रिमंडळ पद्धतीवर पडलेला दिसून येतो. हे सर्व मंत्री मंत्रणा तत्वाचे जाणकार होते. आचार विचारांचे स्वतंत्र पावित्र असलेले हे सर्व मंत्री राजाचे प्रिय असून राजाच्या हितामध्ये दक्ष होते. राजकीय कार्यात सतत मग्न राहणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. (रामा. १७७६१.२) घुष्टी जयंत, विजय राष्ट्र वर्धन, अकोप, धर्मपाल, सुमंत्र हे रामायणामध्ये राज्याचे अष्टप्रधान मंडळ होते. त्यातील सुमंत्र हा अर्थतज्ञ होता. वशिष्ठ व वामदेव हे दोन राज्याचे पुरोहित होते. या शिवाय सुयज्ञ, जाबली, कश्यप, गौतम, दीर्घायु, मार्कंडेय व कात्यायन हे देखील ऋषी मुनी मंत्र्याचे कार्य करीत असत.

**मुख्य शब्द** सत्ता लोकशाही रामायण

## प्रस्तावना

लोकशाही हा शब्द अर्वाचीन असला तरी त्यातील संकल्पना अत्यंत प्राचीन आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा आत्मा असतो. या विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेतून पंचायत राज याचा उगम झाला आणि हे सत्ता विभाजन अति प्राचीन काळापासून होत असलेले दिसते. वेदा नंतर वाल्मिकी रामायण हे पहिले साहित्य निर्माण झाले, हे साहित्य या सदरात मोडणारे असले तरी ते महाकाव्य असल्याने त्याची व्याप्ती सर्वकष दिसते. हे केवळ रामकथा एवढाच त्याचा विषय घेता येत नाही. तर आजच्या संशोधकांना अनेक राजकीय व सामाजिक तत्वांचा शोध घेता येतो. त्यामुळेच आज जी काही पंचायतराज व्यवस्था आपणास सर्वत्र दिसते त्या संकल्पनेचे मूळ रामायणासारख्या हिंदूधर्म ग्रंथांमध्ये आढळून येते

## उद्देश

पंचायत राज्याची संकल्पना रामायणातील राज्यपद्धती मध्ये दिसून येते किंबहुना रामायण हे पंचायतराज पद्धतीचे मूळ उगमस्थान आहे.

## अभ्यास पद्धत

प्रस्तुत विषयाच्या अध्यायना करिता संशोधकांनी विश्लेषण तसेच सर्वेक्षण या पद्धतीचा वापर केला आहे व तशा प्रकारची मांडणी केली आहे.

## गृहितके

 Copyright © 2020 Authors

**ISSN: 2278-4632**
**Vol-10 Issue-6 No. 16 June 2020**

प्रस्तुत विषयाचे लिखाण करण्याकरिता संशोधकाने सर्वप्रथम खालील गृहीतक निश्चित केले आहे. पंचायतराज पद्धतीचे मूळ स्त्रोत रामायण आहे व त्यामधून गांधीजीची विकेंद्रीकरणाची अर्थात सत्ता विकेंद्रीकरणाची संकल्पना उदयाला आली. या सर्व गोष्टीची पडताळणी करणे.

बीज शब्द :

1. रामायण – हिंदु धर्म ग्रंथ
2. मुलस्त्रोत – मुख्य प्रवाह
3. राजनिष्ठा – राज्याप्रती असलेला प्रामाणिकपणा
4. लोकशाही – लोकांचे शासन
5. जनपद – लोकसमुदाय किंवा गट
6. अष्टप्रधान – आठ मंत्री असलेले मंडळ
7. सत्ता विकेंद्रीकरण – सत्ता एकाच ठिकाणी केंद्रीत न होता विविध विभागात असने

**विषय विश्लेषण**

पंचायत राज्य पद्धतीचे मूलस्रोत रामायण आहे व त्यातूनच गांधीजीची विकेंद्रीकरण सत्तेचे अध्ययन करण्यात आले आहे. रामायणामध्ये अयोध्येचे राज्य हे एक सार्वभौम राज्य होते. अत्यंत विशाल अश्या राज्याचे शासन एकट्या राजाने करणे अशक्य होते. म्हणून या राज्यात सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले होते. अनेक जनपदे त्यात होती व ती जनपदे अंतिमतः राजाला जबाबदार होती. इश्वाकूवंशात जन्माला आलेला महान राजा दशरथाच्या मंत्रिमंडळात गुणांनी युक्त असलेले आठ मंत्री होते. याच पद्धतीचा प्रभाव पुढे शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंत्रिमंडळ पद्धतीवर पडलेला दिसून येतो. हे सर्व मंत्री मंत्रणा तत्वाचे जाणकार होते. आचार विचारांचे स्वतंत्रे पावित्र असलेले हे सर्व मंत्री राजाचे प्रिय असून राजाच्या हितामध्ये दक्ष होते. राजकीय कार्यात सतत मग्न राहणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. (रामा. १७६१.२) घुष्टी जयंत, विजय राष्ट्र वर्धन, अकोप, धर्मपाल, सुमंत्र हे रामायणामध्ये राज्याचे अष्टप्रधान मंडळ होते. त्यातील सुमंत्र हा अर्थतज्ञ होता. वशिष्ठ व वामदेव हे दोन राज्याचे पुरोहित होते. या शिवाय सुयज्ञ जाबली, कश्यप, गौतम, दीर्घायु, मार्कंडेय व कात्यायन हे देखील ऋषी मुनी मंत्र्याचे कार्य करीत असत. हे सर्वजण विद्वान, विनयी, जितेंद्र, सुदृढ, शस्त्रविद्येत प्रवीण, पराक्रमी, राजकार्यात सावधान व राज्याज्ञाने राज्यकारभार करीत असत. राज्याचे शत्रु काय करतात? त्यांनी काय केले व काय करणार? याची इत्थंभूत माहिती या मंत्र्यांजवळ राहत असे. सर्वजण कुशल असून राजनिष्ठा त्यांच्या अंगी ठासून भरलेली होती. कोष संचय व चतुरंग सेनेचा संग्रह हे कार्य ते सातत्याने करीत असत. नीतीतज्ञ असलेले हे मंत्री आदर्श शासन करते होते. इतर देशांमध्ये देखील त्यांची ख्याती पसरली होती. विदेशेष्वपि विज्ञातारू सर्वतो बुद्धी निश्चय (रामा. १७६१७) असे ते कुशल होते अशा विविध मंत्र्यांच्या हाती सत्ता सोपवून दशरथाने सत्तेचे विकेंद्रीकरण केले होते. रामाच्या राज्याभिषेकाचा निर्णय घेण्यासाठी दशरथाने सामंत राज्ये व भिन्नभिन्न जनपदाचे शासक यांना निमंत्रित केले होते. (रामा. २६१६४६) या सर्व संदर्भावरून रामायण काळातील लोकशाही पद्धतीचा बोध आपल्याला होतो. दशरथा नंतरच श्रीरामाने ही लोकशाही

 **Copyright © 2020 Authors**

पद्धती पुढे चालविलेली दिसते. सामान्य नागरिकांनी घेतलेल्या आक्षेपावरून पत्नीचा त्याग करून रामाने एक आदर्श राजा अभिव्यक्त केला आहे. प्रजातंत्रातील प्रजेचा मान, अधिकार व हक्क रामाने आपल्या वर्तनातून दाखविले आहे. संपूर्ण रामायणाचे राजकीयदृष्ट्या अवलोकन केले असता असे दिसते की, तेव्हा सर्वत्र कायद्याचे अधिराज्य होते म्हणून स्वतंत्र भारताच्या लोकशाहीची संकल्पना स्पष्ट करताना महात्मा गांधीजींना तिला रामराज्याची संकल्पना असे संबोधले आहे. भारतातही अंधकव्रष्णी या नगरीच्या लोकप्रतिनिधीचे अध्यक्ष श्रीकृष्ण होते. 'आज लोकप्रतिनिधींनी मला खूप प्रश्न विचारून त्रस्त केले' असे श्रीकृष्णाचे उद~गार आहेत. त्यातूनही तत्कालीन लोकशाही पद्धतीची संकल्पना दृष्टीस येते. वर्षानुवर्षे ही परंपरा चालत आलेली दिसते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही सत्ता विभाजनाचे तत्व दिसून येते. ग्रामीण भागात ग्रामपंचायती परंपरेने चालत आलेल्या होत्या असे आपणास दिसून येते. त्या ग्रामामध्ये ग्रामणी अर्थात नाईक हा त्या गावचा मुखिया किंवा प्रमुख म्हणून तो जणू काही लोकनियुक्त आहे असे डॉ. आळतेकर, डॉ. यु. एन घोषाल यांच्यासारख्या संशोधक लेखकांनी सप्रमाणा सिद्ध केले आहे. दक्षिण भारतातील मंदिरांवर असलेल्या शिलालेखातूनही याविषयी सविस्तर माहिती आपणास उपलब्ध होते. आदिवासीमध्ये सुद्धा पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात असलेली दिसते. त्यांना पंचायतराज किंवा जमात असे म्हटले जात होते.

## निष्कर्ष

संशोधकांनी प्रस्तुत विषयाचा अभ्यास केला असता खालील निष्कर्ष प्रामुख्याने दिसून आले.

१. जेव्हा जेव्हा पंचायत राज्य असा उल्लेख होतो तेव्हा तेव्हा महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे, असा उल्लेख केला जातो व गांधीचे तत्वज्ञान रामराज्याची संकल्पना गृहीत धरते.
२. भारतीय पंचायतराज याचा उगम रामायण काळात झाला असे म्हणता येते. कारण शुद्ध नैतिक अधिकारावर आधारलेली जी लोकांची सार्वभौम सत्ता गांधीजींना अपेक्षित होती ती व तिचे मूळ स्त्रोत वाल्मिकी यांच्या रामायणात असलेले स्पष्टपणे दिसून येते.
३. रामायणामधूनच शिवाजी महाराजांनी आपले अष्टप्रधान मंत्रिमंडळ तयार केलेले दिसून येते.
४. त्याच आधारावर भारत सरकारने पंचायत राज व्यवस्था निर्माण करून अनेक मंत्री तयार केले आणि त्यांच्या हाती ती अर्थात राजकीय नेतृत्वाच्या सत्ता दिली आहे.
५. सर्व पंचायतराज चे स्वरूप रामायण यासारख्या ग्रंथातूनच घेतले असल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ

१. डॉ. आळतेकर, 'स्टेट अँड गव्हर्मेंट इन एनशिएंट इंडिया'
२. डॉ. यु. एन घोषाल, 'इंडियन इन्स्टिट्यूशन'
३. जानकीनाथ शर्मा, 'श्रीमद वाल्मीकि रामायण'
४. सुधीर बोधनकर, 'संशोधनाची पद्धती'
५. डॉ. दीपक कोटूरवार, 'संशोधनाची मूलतत्त्वे'
६. डॉ. निलम गोऱ्हे, 'पंचायत मार्गदर्शक'

 **Copyright © 2020 Authors**

ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-6 No. 16 June 2020

७. डॉ. पी. बी. पाटिल, 'लोकप्रशासन'
८. डॉ. सुदर्शन खापर्डे, 'ग्रामपंचायतीचे प्रशासन'
९. डॉ. सतिश ठोंबरे, 'भारतातील स्थानिक प्रशासन'
१०. डॉ. पंडीत नलावडे, 'सत्ता विकेंद्रीकरण आणि 73वी घटना दुरुस्ती'
११ रविद्र चव्हान, 'महाराष्ट्र पंचायतीराज भाग 1 व 2'
१२. Panchayatraj Portal
१३. www. panchayat.nic.in

 Copyright © 2020 Authors